आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
८ सप्टेंबर २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- युपीआय प्रमाणेच वीमा आणि इतर वित्तीय उत्पादनं सुलभतेने नागरिकांना मिळण्यासाठी प्रयत्न करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मुंबईत उद्योजकांना आवाहन

- वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरच्या तिसऱ्या टप्प्यांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण, जवाहरलाल नेहरू बंदराला जोडणाऱ्या राज्यातल्या कॉरिडॉरचा समावेश

- खेळाडूंना सरकारी क्षेत्रात ५ टक्के आरक्षण देण्याचा राज्य सरकारचा निर्णय

आणि

- जागतिक पॅरा तिरंदाजी स्पर्धेत आज भारतीय खेळाडूंना २ सुवर्णपदकांसह ५ पदकं

**<><><><><>**

यूपीआय प्रमाणे वीमा, कर्ज मिळवणं, निवृत्ती वेतन, शेअर बाजारातले व्यवहार यासारख्या गोष्टी नागरिकांना सुलभरित्या उपलब्ध करुन देण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज जगभरातल्या उद्योजकांना केलं. प्रधानमंत्र्यांनी मुंबईच्या वांद्रे-कुर्ला संकुलात ७व्या ग्लोबल फिनटेक फेस्टचं उद्घाटन केलं, त्यावेळी ते बोलत होते.

- **- - प्रधानमंत्री बाइट १ - - -**

जगात वित्तीय तंत्रज्ञान या विषयावरची कोणतीही चर्चा यूपीआयचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, असे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले. आता हे तंत्रज्ञान ११ देशांमध्ये सक्रीय असून आणखी इतर देशांमध्ये त्याचा स्वीकार व्हावा यासाठी प्रयत्न करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. जगभरातल्या विविध देशांमध्ये काम करणाऱ्या भारतीयांना UPI ची सुविधा मिळाली तर मायदेशी पैसे पाठवणं त्यांना सुलभ होईल. तसंच हे तंत्रज्ञान आपण विकसित केलं असल्यानं त्याचे नियम आपल्याला ठरवता येईल, असंही ते म्हणाले.

वित्तीय तंत्रज्ञान क्षेत्र बळकट करण्यासाठी नवोन्मेष आणि सायबर सुरक्षा या दोन घटकांवर भर देण्याचं आवाहन त्यांनी केलं.

- ***- होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी - -***

जगातल्या सध्याच्या संघर्षपूर्ण आणि अस्थिर परिस्थितीतही भारतावरचा जगाचा विश्वास वाढत आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. जपानच्या क्रेडिट रेटिंग एजन्सीनं भारताचं सॉव्हरिन रेटिंग एक स्थान वर चढवलं आहे आणि ही प्रगती भारतानं ३० वर्षांनंतर केली आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधलं. त्यापूर्वी त्यांनी राज्यातल्या नागरिकांना आगामी गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

उद्घाटनापूर्वी प्रधानमंत्र्यांनी या प्रदर्शनात सहभागी झालेल्यांशी संवाद साधला आणि विविध दालनांना भेट देऊन फिनटेक क्षेत्रात होत असलेल्या नवोन्मेषाविषयी जाणून घेतलं. ११ सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या या परिषदेत ८०हून जास्त देशांमधून ८ हजारापेक्षा जास्त संस्था सहभागी झाल्या आहेत.

**<><><><><>**

देशात औद्योगिक निर्मितीचं चित्र गेल्या १२ वर्षात पूर्णतः बदललं असून अनेक उत्पादनं आता देशातच तयार होतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरच्या ३२६ किमी लांबीच्या मार्गांचं लोकार्पण बडोद्यातून केल्यावर ते बोलत होते. देशाच्या पश्चिम भागातल्या ५ राज्यांमधून मालवाहतुकीसाठी आणि दळणवळणासाठी समर्पित हा रेल्वेमार्ग एक लाख ३० हजार कोटी रुपये खर्चून बांधण्यात येत आहे. त्यातल्या ३२६ किलोमीटर लांबीच्या ३ टप्प्यांचं लोकार्पण आज मोदी यांनी केलं.

**- - - होल्ड प्रधानमंत्री बाइट - - -**

प्रवासी आणि मालवाहतुकीसाठी वेगवेगळे लोहमार्ग उपलब्ध झाल्यामुळे दररोज ४३० पेक्षा जास्त मालगाड्या धावू शकतील. शेतकऱ्यांना नाशवंत माल बाजारपेठेत जलदगतीनं पोचवण्यासाठी या मार्गाचा फायदा होईल. जेएनपीटीला देशाच्या विस्तीर्ण भूभागाशी जोडणारी वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कार्यान्वित झाल्यामुळे महाराष्ट्राच्या लॉजिस्टिक्स क्षमतेला मोठी चालना मिळणार आहे. या माध्यमातून देशातील सुमारे ५५ टक्के कंटेनर वाहतूक हाताळणाऱ्या जेएनपीटीच्या माध्यमातून होणाऱ्या मालवाहतुकीत या मार्गिकेमुळे मोठी वाढ होईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले.

**<><><><><>**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर उपस्थित झालेले सर्व मुद्दे सोडवले आहेत. तरी त्यात काही अडचणी वाटत असतील तर मनोज जरांगे यांनी त्या विचाराव्या असं आवाहन मुख्यमंत्री

देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. तर मराठा आरक्षण प्रकरणी मनोज जरांगे यांनी उपस्थित केलेल्या सर्वच मुद्द्यांवर सरकारनं सकारात्मक भूमिका घेऊन एक पाऊल पुढे टाकलं आहे. आता त्यांनी सकारात्मक प्रतिसाद द्यावा अशी भूमिका मराठा आरक्षण विषयक मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना मांडली.

**- - होल्ड - विखे पाटील - -**

**- <><><><>**

राज्यातल्या प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय आणि इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५ टक्के आरक्षणाबाबत सुसूत्रता आणण्यासाठी सुधारित धोरण लागू करायला आज मंत्रिमंडळानं मान्यता दिली. या सुधारित धोरणानुसार आरक्षणासाठी पात्र खेळाडूंना तीन महिन्यांच्या मुदतीत क्रीडा प्रमाणपत्राची वैधता पडताळणी करून घेणं आवश्यक आहे.

ऑलिम्पिक - समर स्पर्धांमधले २००५ नंतर सलग तीन ऑलिम्पिक गेम्समध्ये समाविष्ट असलेले खेळ, तसंच कबड्डी, खो-खो, बुद्धीबळ, मल्लखांब, आणि क्रिकेट हे खेळ आरक्षणासाठी पात्र असतील. पात्र खेळांची ही अट ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक, आशियाई, पॅरालिम्पिक आशियाई, आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांना लागू राहणार नाही.

**<><><><>**

अन्न आणि औषध प्रशासनानं मुंबईतल्या जुहू इथल्या इस्कॉन मंदिरातल्या गोविंदा उपहारगृहासह एकूण ११ उपहारगृहांचा परवाना निलंबित केला आहे. त्यात इस्कॉन मंदिरातल्या गोविंदा उपहारगृहासह इतर दोन उपहारगृहांचा समावेश आहे. गेल्या आठवडाभरात अन्न आणि औषध प्रशाननानं केलेल्या तपासण्यांमध्ये या उपहारगृहांमध्ये अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेच्या नियमांचं गंभीर उल्लंघन आढळून आल्यानं ही कारवाई केली असल्याचं एफडीएच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे. याशिवाय झेप्टोच्या मालाड आणि कळव्यातल्या केंद्रावरही एफडीएनं कारवाई केली आहे.

**<><><><>**

जातिआधारित जनगणना करण्याची मागणी करणारा ठराव आज तमिळनाडू विधानसभेने मंजूर केला. जनगणनेच्या प्रक्रीयेचा लाभ प्रत्येकाला मिळाला पाहिजे, तसंच लोकसंख्येचं जातवार सामाजिक स्थान स्पष्टपणे दिसलं पाहिजे, या हेतूनं जनगणनेत जातीची

नोंद करावी अशी मागणी केंद्रसरकारकडे केली आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री अधव अर्जुन यांनी दिली.

<><><><><>

नवी दिल्लीत येत्या १२ आणि १३ तारखेला होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासह अनेक नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा करतील. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आज नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. द्विपक्षीय चर्चेदरम्यान उपस्थित होणाऱ्या अनेक मुद्द्यांपैकी रशिया-युक्रेन संघर्ष हा एक महत्त्वाचा मुद्दा असेल, असंही जयस्वाल यांनी सांगितलं. भारत आणि चीनमधले संबंध हळूहळू सकारात्मक दिशेने वाटचाल करत असल्याचं जयस्वाल यांनी सांगितलं. संबंधांमधली ही हळूहळू होणारी सुधारणा आणि दोन्ही देशांतील लोकांचे परस्पर संबंध अत्यंत महत्त्वाचे आहेत, असेही ते म्हणाले. नेपाळमधल्या विनाशकारी पुराबाबत ते म्हणाले की, भारताने या संकटाच्या वेळी तत्परतेने प्रतिसाद दिला असून मदत, बचाव आणि पुनर्बांधणीच्या कामात सहकार्य करणे सुरूच ठेवेल. आतापर्यंत सात विमानांद्वारे ९५ टन मदतसामग्री पाठवण्यात आली असून, आणखी काही मदतसामग्री लवकरच पाठवली जाईल, अशी माहिती जयस्वाल यांनी दिली.

<><><><><>

जागतिक पॅरा तिरंदाजी स्पर्धेच्या शेवटून दुसऱ्या दिवशी भारतानं २ सुवर्ण, २ रौप्य आणि १ कांस्य अशा ५ पदकांची कमाई केली. अहमदाबाद इथं सुरू असलेल्या या स्पर्धेत पुरुषांच्या कंपाउंड सांघिक प्रकारात विद्यमान विश्वविजेता तोमन कुमार आणि श्याम सुंदर स्वामी या जोडीनं सुवर्णपदक पटकावलं, तर सांघिक रिकर्व्ह प्रकारात हरविंदर सिंह आणि विजय सुंदी यांनी सुवर्णपदकाची कमाई केली. महिलांच्या रिकर्व्ह प्रकारात भावना आणि पूजा यांना चीनच्या संघाने पराभूत केल्यामुळे रौप्यपदकावर समाधान मानावं लागलं. तर डब्ल्यू १ मिश्र प्रकारात स्वाती आणि आदिल मोहम्मद नझीर अन्सारी यांनीही रौप्यपदक मिळवलं. वैयक्तिक डब्ल्यू १ प्रकारात स्वातीनं कांस्यपदक जिंकलं. महिलांच्या कंपाउंड प्रकारात मात्र भारताचं कांस्यपदक हुकलं.

//<><><><><>//